# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

'ज्ञानातीर्थ', विष्णुपुरी, नांदेड ४३१ ६०६

जावक क्र.परीक्षा/२००९–२०१०/ दिनांक : ०१.०४.२०१०

प्रति,

मा.प्राचार्य

सर्व संलग्नित महाविद्यालय

प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : – व्यावसायीक अभ्यासक्रमाप्रमाणे सर्व अव्यावसायीक पदवी सत्र निहाय अभ्यासक्रमासाठीं युटी (Under taking) ची सुविध उपलब्ध करून देणे बाबत.

संदर्भ :– मा.परीक्षा मंडळ निर्णय दिनांक १३–०२–२०१०.

महोदय,

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, दिनांक ०५–०२–२००४ रोजी संपन्न झालेल्या मा.परीक्षा मंडळाच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २००३–०४ पासून महाविद्यालयातील अव्यावसायीक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी सत्र पध्दती अवलंबिण्यात आली आहे. त्याच धर्तीवर २००९–१० मध्ये अव्यावसायीक अभ्यासक्रमासाठी पदवी स्तरावर सत्र पध्दती लागू झाली आहे. त्यामुळे व्यावसायीक व अव्यावसायीक सत्र पध्दती मध्ये प्रथम व तृतिय सत्रासाठी निकाल जाहीर न करता फक्त विद्यार्थ्यानि मिळविलेले गुण जाहीर केले जातात. अशा वेळी कांही विद्यार्थी एक किंवा एका पेक्षा जास्त विषयात अनुत्तीर्ण होतात. परंतू अशा विषयात त्यांना मिळालेले गुण हे लाभांश गुण मिळण्यास पात्र असू शकतात. विद्यार्थ्यांना अशा विषयाची पुन्हा परीक्षा देण्याची आवश्यकता नाही. असे विद्यार्थी संबंधित विषयासाठी युटी (Under taking) ठेवून राहीलेली इतर विषय (असल्यास) देवू शकतात.

जेव्हा दुस–या/चौथ्या/सहाव्या/आठव्या सत्राची परीक्षा होते तेंव्हा त्यापरीक्षेचा निकाल जाहीर करताना अशा विद्याथ्यांनी संबंधित अनुत्तीर्ण विषयात पूर्वी मिळविलेल्या गुणाचा विचार करून दोन्ही सत्राच्या एकूण विषयाच्या गुणाच्या आधारे टक्केवारी नुसार लाभाश गुण देण्यात येतात. हिच पध्दती नव्याने सुरू झालेल्या अव्यावसायीक पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रमासाठी लागू करण्यात यावे व त्यासाठी खालील मुद्ये संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात यावे असा निर्णय देण्यात आलेला आहे.

१) ज्या विद्यार्थ्यांनी युटी (Under taking) मागितलेली आहे. अशा विद्यार्थ्यांना त्या विषयाची परीक्षा देता येणार नाही.

२) जर विद्यार्थी इतर सर्व विषयात उत्तीर्ण असेल व केवळ लाभांश गुण मिळण्यास पात्र असलेल्या विषयातच अनुत्तीर्ण असेल आणि त्या विषयासाठी युटी (Under taking) मागितली असेल तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. मात्र परीक्षा फॉर्म भरावा व त्यात स्पष्ट UT युटी असे उल्लेखीत करावे.

३) जरी एखादया विद्यार्थ्याने युटी ठेवून परीक्षा दिली असेल तरीही अशा परीक्षेचे गुण विचारात घेतले जाणार नाही व पुर्वी मिळवलेले गुणच विचारात घेतले जातील.

तरी मा.परीक्षा मंडळाने घेतलेला वरील निर्णयाप्रमाणे सर्व संबंधित संलग्न महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे. कृपया सर्व संबंधित विद्यार्थी, कर्मचारी यांना निदर्शनास आणून द्यावे. ही विनंती.

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक